## Criterion 7 – Institutional Values and Best Practices

### 7.1.1 Measures initiated by the institution for the promotion of gender equity during year 2022-23

**Annual gender sensitization action plan**
**Academic Year 2022-23**

| Sr. No. | Actions | Time line |
|---|---|---|
| 01 | College arranged programs for the promotion of gender equity. College has MoU with SantGadge Baba MahilaMahavidyalya, Bhusawal. | 5 Years (24 Dec. 2020 To 23 Dec. 2025 |
| 02 | Organize Speech on "Career in IT Sector" | Sept 2022 |
| 03 | Organize Speech on "Scope in Higher Education After Graduation | Feb 2023 |
| 04 | Organize MahilaBachat Gat Exhibition | Mar 2023 |
| 05 | Organize Girls Students Personality Development Workshop | Mar 2023 |
| 06 | To Celebrate International Women's Day | Mar 2023 |
| 07 | Organize Yoga Campaign for girls students | Mar 2023 |
| 08 | Organize Speech on "Gender Equity" | Apr 2023 |
| 09 | Counseling to girl students | Yearly |

Sardar V.P. Arts & Sci. College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

**Implementation of Action Plan**

**For the promotion of gender equity college established the different committees.**

## 1. Awareness drive for HarGharTiranga and flag code

Sardar Vallabhbhai Patel Arts and Sciences College, Ainpur and SantGadagebaba Hindi Mahavidyalaya, Bhusawal jointly organized a online program on Awareness Drive for “HarGharTiranga and Flag Code” on 19/07/2022 under MoU. The program was chaired by the Principal, Dr. Ramesh. Joshi, Bhusawal. The program was introduced by Principal, Dr. J.B. Anjane, Ainpur. Prof. Sunil Kulkarni, Director Student Development KBC NMU, Jalgaon delivered speech on Indian Freedom Struggle. Prof. Dr. JagadishTorawane Director of physical education, Late Annasaheb D. R. DeoreMahavidyalaya, Mhasadiexplain the Indian Flag Code. In Presidential speech Principal, Dr. Ramesh Joshi said it is the responsibility of youth to success the Awareness Drive for HarGharTiranga. The said program was anchored by Dr. V. N. Ramteke and Dr. Sudhir Sharma expresses the vote of thanks. Total 208 participants are present for this program.





दैनिक लोकशाही

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा जनजागृती अभियान

लोकशाही न्युज नेटवर्क
ऐनपूर, ता.रावेर वार्ताहर

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर व श्री संत गाडगेबाबा हिंदी महाविद्यालय भुसावळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१९ जुलै २०२२ रोजी हर घर तिरंगा जनजागृती अभियान अंतर्गत एक दिवसीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

त्यात प्रमुख वक्ता सुनील कुलकर्णी, संचालक, विद्यार्थी विकास, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की अमर सेनानी व थोर नेत्यांचे आपल्याला सतत स्मरण राहावे, तसेच स्वातंत्र्याचा दैदिप्यमान इतिहास आपल्याला कळावा हेच या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तसेच दुसरे प्रमुख वक्ते प्रा.डॉ.जगदीश तोरवणे, क्रीडा संचालक, स्व.आण्णासाहेब डी. आर.देवरे महाविद्यालय, म्हसदी यांनी भारतीय ध्वज संहिता सांगितली. तिरंग्याचा अपमान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. ध्वज केव्हा फडकावला जातो या बाबतीत महत्वपूर्ण माहिती दिली.कार्यक्रमाच्या सुरवातीला प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी प्रास्ताविक केले.तसेच प्राचार्य डॉ. रमेश जोशी, भुसावळ यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात हा कार्यक्रम आंतर विद्यापीठ कार्यक्रम म्हणून साजरा झाला आहे असे सांगितले. अनेक वीर स्वातंत्र्य घर झेंडा जनजागृती अभियान सफल करण्याची जबाबदारी सर्व नवयुवकांची आहे असेही त्यांनी सांगितले. दि.११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा झेंडा लावून हा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आनंदाने साजरा करावा असेही त्यांनी सांगितले. सूत्रसंचलन प्रा.डॉ.विनोद रामटेके यांनी केले व आभार डॉ.सुधीर शर्मा यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दोन्ही महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंदांनी परिश्रम घेतले.२०८ विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थित होते.

Lokshahi Edition
Jul 20, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

## 2. Career Guidance Program: Speech on "Career in IT Sector":

The new era is world of information and technology so college organized the programme on 29 Sept. 2022 namely "Career in IT sector" in collaboration with Ninja Coders Hub and placement and training job cell Bangalore. Mrs. ManasiPatil, guided the new era and career in information technology. Also HemangiPatil, Nikita Jawale, VibheshPatil and SaurabhPhalak were demonstrate the the skill of interview and different courses in IT Sector. The programme was presided by Hon.PrincipalDr.J.B. Anjane, anchored by Dr.VinodRamteke and vote of thanks by Dr.J.P.Nehete. Nearly 105 students were actively participated.

दैनिक **महाराष्ट्र सारथी**

01 Oct 2022 - Page 6

# ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन



**महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**ऐनपुर । प्रतिनिधी :**

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात करियर मार्गदर्शन केंद्रामार्फत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षणासोबत जॉब ओरिएंटेड कोर्स करणे आवश्यक आहे.असे कोर्सेस केलेले असले तर जॉब सहज मिळू शकतो असे त्यांच्या भाषणामध्ये सांगितले. तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्राध्यापिका मानसी पाटील, निंजा कोडर्स हब , यांनी प्लेसमेंट अँड ट्रेनिंग जॉब सेल बेंगलोर यांच्या अंतर्गत इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी मध्ये करिअरच्या संधी विषयी मार्गदर्शन केले. तसेच हेमांगी पाटील,निकिता जावळे,विभेश पाटील सौरभ फालक यांनीही मुलाखत तंत्र, उत्कृष्ट सादरीकरण बाबत मार्गदर्शन केले. आय टी क्षेत्रातील विविध कोर्सेस ची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. व्ही. एन. रामटेके यांनी केले. कार्यक्रमाला १०५ विद्यार्थी उपस्थित होते . कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा. डॉ. व्ही. एन. रामटेके प्रा. डॉ. जे.पी. नेहेते, प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे प्रा. डॉ. एस. एन. वैष्णव प्रा. डॉ. एच. एम. बाविस्कर व विलास एच. पाटील यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील शंका विचारून समाधान करून घेतले. मान्यवरांचे आभार डॉ. जे.पी. नेहेते यांनी मानले.

## 3.Speech on “Scope in Higher Education After Graduation”:

College was organized “Scope in Higher Education After Graduation” on 25 Feb. 2023 with Sandip University Nashik. Chief guest of this program Mr. NileshBansode, Sandip University, Nasik guided students about different fields in higher education after education. The programme was presided by Principal Dr. J.B. Anjane, anchored by Dr.S.N. Vaishanv and vote of thanks by Mr. MilindBhope. 52 students participated in this program.

लोकशाही

# पदवी नंतर उच्च शिक्षणातील विविध वाटा या विषयावर व्याख्यान

लोकशाही न्युज नेटवर्क
ऐनपूर, ता.रावेर वार्ताहर



ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाच्या सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रा तर्फे विद्यार्थ्यासाठी ञ्पदवी नंतर उच्च शिक्षणातील विविध वाटा या विषयावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या सुरवातीला लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेलांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

व्यासपीठावर निलेश बनसोडे, विशाल बारी, प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने, डॉ.सतीश वैष्णव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ.सतीश एन.वैष्णव यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक निलेश बनसोडे, संदीप युनिव्हर्सिटी नाशिक यांनी आपल्या मार्गदर्शनात पदवी नंतर उच्च शिक्षणातील विविध पर्याय याबद्दल माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांना पदुत्तर शिक्षणासाठी घेतल्या जाणाऱ्या विविध प्रवेश परीक्षा व त्यांचे स्वरूप समजावून सांगितले.

विद्यार्थ्याशी हितगूज करतांना संदीप युनिव्हर्सिटी नाशिक येथे पदव्युत्तर शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या विषयांबद्दल माहिती दिली, त्यांच्या विविध शंकाचे निरसन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांनी परंपरागत पदव्युत्तर शिक्षणाए- ेवजी आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी उपयोगात्मक विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेणे जास्त योग्य आहे असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सतीश एन. वैष्णव यांनी तर आभार प्रा मिलिंद भोपे यांनी मानले. सदर कार्यक्रमाला एकूण ५२ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. जयंत नेहेते, प्रा. एच एम. बाविस्कर, कु. सुषमा मोतेकर, कु. यास्मिन पटेल आणि सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

Lokshahi Edition
Feb 27, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

## 4.MahilaBachat Gat Exhibition:

Under the promotion of gender equity, college was organized the MahilaBachat Gat exhibition on13th March 2023. Exhibition was inaugurated by Hon Principal Dr.J.B.Anjane. President of EkdantMahilaBachat Gat Smt. Jyotsna Mahajan gave the guidanceabout entrepreneurship to girl students.

लोकशाही जळगाव, बुधवार, दि.१५ मार्च २०२३

# बचत गटाच्या माध्यमातून स्वावलंबी व्हा - जोत्स्ना महाजन

लोकशाही न्युज नेटवर्क
ऐनपूर, ता.रावेर वार्ताहर

ऐनपूर परीसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे युवतीसभेद्वारे एकदंत ग्राम संघ बचत गटा मार्फत विविध वस्तूंचे प्रदर्शन नुकतेच संपन्न झाले.

प्रदर्शनाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी केले. एकदंत महिला बचत गटाच्या अध्यक्षा जोत्स्ना महाजन यांनी विद्यार्थीनीना बचत गटामार्फत विविध व्यवसाय करून स्वावलंबी व्हा असे मार्गदर्शन केले. प्रदर्शनात केळी वेपर्स, पापड, कुरडया, मिरची पावडर, ज्वेलरी, मिरची पावडर, मसाले, कपडे, ब्लाउज पीस इत्यादी वस्तू मांडण्यात आल्या होत्या. विद्यार्थीनींनी या वस्तूंची खरेदी केली तसेच एकदंत ग्राम संघातर्फे संस्कृती ब्युटी पार्लरच्या संचालिका वैशाली चौधरी यांनी बचत गटामार्फत महिलांसाठी सवलतीच्या दरात प्रमाणपत्र व प्रशिक्षणाच्या योजनेच्या बाबत विद्यार्थिनींना माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन युवती सभा सचिव डॉ.नीता वाणी यांनी केले त्यांना डॉ.रेखा पाटील यांनी सहकार्य केले.



## 5. Girls Students Personality Development Workshop:

University student welfare department and college jointly organized Girls' student's personality development workshop on 03 March 2023. The workshop was Inaugurator by the auspicious hands of Smt.SunandabaiPatil, Nimbol. On her inaugurator speech she nicely explained the stories of successful women. Smt. VimalPatil teacher of S.V. College Ainpur explained the importance of women education. Smt. VandanaPatil, Sarpanch, gave the guidance about role of women in politics. Smt. Jyotsna Mahajan guided about BachatGat and source of income. The workshop was presided by Principal Dr. J. B. Anjane, anchored by Dr. RekhaPatil. 64 girls students were actively participated.

पुण्यनगरी

शनिवार,४ मार्च २०२३

# सावित्रीबाई फुले यांचे कार्य समाजाला दिशा देणारे : प्राचार्य. डॉ. अंजने

ऐनपूर, ता. रावेर : सावित्रीबाई फुलेंच्या कार्यामुळेच आज स्त्रिया आघाडीवर आहे. सावित्रीबाई फुल्यांचे कार्य समाजाला दिशा व प्रेरणा देणारे आहे. मुलींनी केवळ लग्नाचे वेटिंग म्हणून शिकू नये तर करियर साठी शिकावे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने आपल्या समारोपीय अध्यक्षीय भाषणात केले.

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात युवतीसभेद्वारे महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा नुकतीच पार पडली. कार्यशाळेचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी भूषविले. उदघाटन सुनंदाबाई पाटील निंबोल यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख वक्ते निंबोल सरपंच वंदनाबाई पाटील,सुलभा पाटील, उपशिक्षिका विमल पाटील,सुरेखा पाटील,श्रीमती जोत्स्ना महाजन, होत्या.

कार्यशाळेचे उदघाटन सुनंदाबाई पाटील यांच्या शुभहस्ते सावित्रीबाई फुलेंच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून आणि दीप प्रज्वलन करून करण्यात आले.प्रास्ताविक

## ऐनपूर महाविद्यालयात विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा

युवतीसभेच्या सचिव डॉ. नीता वाणी यांनी केले.प्रथम सत्रात उदघाटक सुनंदाबाई पाटील यांचे उदघाट्नपर भाषण झाले.त्यांनी विशेष कार्य केलेल्या महिलांचे दाखले देऊन तुम्हीही त्यांचा आदर्श घ्या असे विद्यार्थीनींना आवाहन केले. द्वितीय सत्राचे पहिले पुष्पगुच्छ उपशिक्षिका विमल पाटील यांनी स्त्री शिक्षण या विषयावर मार्गदर्शन केले.त्यांनी स्वतःचे अनुभव कथन करून



सुसंस्कृत पिढी घडविण्याचे शिक्षण हे एक माध्यम आहे असे त्या म्हणाल्या शिक्षणातून सुसंस्कार मुलींनी घ्यावे, चांगल्या वाईटाची पारख करा. आई वडिलांचे ऋण, आपली संस्कृती विसरू नका. आपले राहणीमान, वर्तन चांगले ठेवा, शैक्षणिक प्रगती चांगली करा असे त्या म्हणाल्या.

दुसरे पुष्प निंबोल गावच्या सरपंच वंदना पाटील यांनी गुंफले. महिलांची राजकारणातील भूमिका या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्राचे पहिले पुष्पगुच्छ सुरेखमणी ब्युटीकेयर रावेर च्या संचालिका सुरेखा पाटील यांनी गुंफले.दुसरे पुष्पगुच्छ श्रीमती जोत्स्ना महाजन यांनी गुंफले महिला बचतगट आणि महिलांचे उन्नयन या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. आभार प्रा. यास्मिन पटेल यांनी मानले विशेष सहकार्य प्रा. सुषमा मोतेकर यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रेखा पाटील यांनी केले कार्यशाळेस ६४ विद्यार्थीनी सहभागी होत्या.

देशदूत

www.deshdoot.com

जळगाव । शनिवार, दि. ४ मार्च २०२३

ऐनपूर ता. रावेर । वार्ताहर-

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे युवतीसभेद्वारे महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा नुकतीच झाली. कार्यशाळेचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी भूषविले. उद्घाटन सौ. सुनंदाबाई भागवत पाटील निंबोल यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रमुख वक्ते निंबोल ग्रामपंचायत सरपंच सौ. वंदनाबाई संजय पाटील, सौ. सुलभा किशोर पाटील निंबोल, सौ. विमल वेडू पाटील उपशिक्षिका स. व. प विद्यालय ऐनपूर, सौ. सुरेखा मनिष पाटील संचालक सुरेखमणी ब्युटी केयर रावेर, श्रीमती जोत्स्ना महाजन, अध्यक्ष, एकदंत महिला बचतगट



# सावित्रीबाईंचे कार्य समाजाला दिशा व प्रेरणा देणारे-प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने

## ऐनपूर महाविद्यालयात युवतीसभेद्वारे विद्यार्थिनींसाठी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा

या होत्या.

कार्यशाळेचे उद्घाटन सौ. सुनंदाबाई भागवत पाटील निंबोल यांच्या शुभहस्ते सावित्रीबाई फुलेंच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून आणि दीप प्रज्वलन करून करण्यात आले. प्रास्ताविक आणि पाहुणे परिचय युवतीसभेच्या सचिव डॉ. नीता वाणी यांनी केले त्यानंतर मान्यवरांचा सत्कार शाल व बुके देऊन करण्यात आला. प्रथम सत्रात उदघाटक सौ. सुनंदाबाई भागवत पाटील यांचे उदघाट्नपर भाषण झाले. द्वितीय सत्राचे पहिले पुष्पगुच्छ उपशिक्षिका सौ. विमल पाटील स. व. प. विद्यालय, ऐनपूर यांनी स्त्री शिक्षण या विषयावर मार्गदर्शन केले. दुसरे पुष्प निंबोलच्या सरपंच सौ.वंदनाबाई संजय पाटील यांनी गुंफले. महिलांची राजकारणातील भूमिका या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. तिसरे पुष्प सौ. सुलभा किशोर पाटील यांनी गुंफले साहित्यातील स्त्रीया या विषयावर त्या बोलल्या. तिसऱ्या सत्राचे पहिले पुष्पगुच्छ सुरेखमणी ब्युटीकेयर रावेरच्या संचालिका सौ. सुरेखा मनिष पाटील यांनी गुंफले त्या स्त्री सौंदर्य आणि त्वचेची निगा या विषयावर बोलल्या. दुसरे पुष्पगुच्छ जोत्स्ना महाजन यांनी गुंफले महिला बचतगट आणि महिलांचे उन्नयन या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रश्नोत्तरे चे सत्र झाले वक्त्यांना विविध प्रश्न विचारून विद्यार्थिनींनी शंका समाधान केले. कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने आपल्या समारोपीय भाषणात मुलींनी केवळ लग्नाचे वेटिंग म्हणून शिकू नये तर करियर साठी शिकावे, असे सांगितले. आभार प्रा. यास्मिन पटेल यांनी मानले विशेष सहकार्य प्रा. सुषमा मोतेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रेखा पाटील यांनी केले. कार्यशाळेस ६४ विद्यार्थीनी सहभागी होत्या.

## 6. Celebration of International Women's Day:

College was celebrate the International Women's Day on 08 March 2023 with NSS and Students welfare Departmentof college. The function was inaugurated by Dr.S.N.Vaishnav. Dr.NeetaWani, Ladies NSS programme officer of our college was nicely explained the speech gender equity. Our student NishaAwasarmal read the poem on Women. The programme was anchored by Mr. S. P. Umariwad. 88 participants attained this celebration function.



लोकशाही

जळगाव, गुरूवार दि.९ मार्च २०२३

# ऐनपूर महाविद्यालयात महिला दिनाचे आयोजन

लोकशाही न्युज नेटवर्क
ऐनपूर, ता.रावेर ✍ वार्ताहर

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिना निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष रसायन शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.एस.एन.वैष्णव यांनी स्वतःचे निर्णय स्वतः घ्या आणि एक आदर्श महिला म्हणून विकास करा असे त्यांच्या मार्गदर्शनामध्ये सांगितले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.डी.बी.पाटील यांनी भारतातील महिलांचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले. तसेच आजच्या या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.नीता वाणी यांनी आजही महिलांमध्ये लिंगभेद केला. जातो असे त्यांच्या मार्गदर्शनामध्ये सांगितले. तसेच महिला कार्यक्रम अधिकारी व मराठी विभागाचे विभाग प्रमुख डॉ.रेखा पी.पाटील यांनी लिंग समानता याविषयी अमोल असे मार्गदर्शन केले. आजही आपल्या समाजामध्ये लिंगभेद केला जातो. असे त्यांनी सांगितले. आजच्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी केले. तसेच निशा अवसरमल या विद्यार्थिनीने महिला दिनावर आधारित कवितेचे वाचन केले.

या कार्यक्रमाला ८८ विद्यार्थी, प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. व्ही.एन.रामटेके डॉ. डी.बी.पाटील, प्रा.एस.पी.उमरिवाड डॉ.एस.एन.वैष्णव प्रा.प्रदीप तायडे,प्रा.नरेंद्र मुळे, प्रा.अक्षय महाजन प्रा.ज्ञानेश्वर कोळी यांनी परिश्रम घेतले. शेवटी आजच्या कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे आभार विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.व्ही.एन.रामटेके यांनी मानले व अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



**7. Yoga Campaign for Girls students:**

For the empowerment of girl students, College was organized one week workshop on “Yoga” during 11-17 Mar 2023 especially for girl students. The workshop was guided by Smt.Swati Joshi and Smt.KomalPatil gave the practical training on Yoga. 56 girls were actively participated.



लोकशाही जळगाव

जळगाव, बुधवार, दि. १५ मार्च २०२३

**ऐनपूर महाविद्यालयात युवतीसभेद्वारे विद्यार्थिनींसाठी योगा शिबिर[illegible]ायोजन**

लोकशाही न्युज नेटवर्क
ऐनपूर, ता.रावेर वार्ताहर

ऐनपूर परीसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे युवतीसभेद्वारे विद्यार्थीनिंसाठी सात दिवसांकरिता योगा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रस्तुत शिबिराचे उदघाटन महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.नीता वाणी यांनी केले. आपल्या उदघाटनपर भाषणात त्यांनी योगाचे महत्व सांगून वर्तमानकाळात सर्व वयोगटाला आरोग्य चांगले राखण्यासाठी योगाची आवश्यकता आहे असे सांगून त्यांनी जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी शिबिराचा लाभ घ्यावाअसे आवाहन केले. युवती सभा सचिव डॉ. नीता एस. वाणी यांनी शिबिराचा उद्देश कथन करून शिबिराबाबत माहिती दिली. विद्यार्थिनींना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन योगा शिक्षक श्रीमती स्वाती जोशी या करत आहेत. त्यांनी प्रथम योगाचे प्रकार, योगाचे महत्व, वेगवेगळ्या आजारासाठी कोणता योगा करावा याबाबत मार्गदर्शन केले त्यांच्यासोबत योगा शिक्षक श्रीमती कोमल पाटील त्यांना सहकार्य करीत आहेत. शिबिरास युवती सभा सचिव डॉ. नीता वाणी यांना डॉ. रेखा पाटील,डॉ.व्ही.एन.रामटेके तसेच , जयेश बढे, श्रेयस पाटील शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळत आहे. योगा शिबिरात ५६ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला आहे.

**8. Student Development Program: Speech on “Gender Equity”:**

For the promotion of gender equity, College was organized Gender equity programmeon 8 April 2023. Chief Guest Dr. RekhaPatil and Dr. V. N. Ramteke, were gave the speech on importance of gender equity. 97 students, teachers and non-teaching staff attained this program. The programme was anchored by Mr. S. P. Umariwad and vote of thanks by Mr. PradipTayade.



लोकशाही

जळगाव, मंगळवार दि. ११ एप्रिल २०२३

**स्त्री- पुरुष समानता काळाची गरज या विषयावर व्याख्यान**

लोकशाही न्युज नेटवर्क
ऐनपूर, ता. रावेर प्रतिनिधी

येथिल ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात समान संधी केंद्रांतर्गत स्त्री-पुरूष समानत काळाची गरज या विषयावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अंतर्गत गुणवत्ता मूल्यमापन कक्ष आणि रसायनशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.एस.एन.वैष्णव होते. तर प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.रेखा पी.पाटील आणि मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.व्ही.एन.रामटेके होते.

प्रा.डॉ.रेखा पाटील यांनी स्त्री-पुरूष समानता काळाची गरज या विषयावर विचार व्यक्त करतांना म्हटले की, स्त्री आणि पुरूष हे समाजरूपी रथाचे दोन चाके आहेत. समानतेच्या वाटेवर चाल-ताना व्यक्तीमूल्य आणि समाज व्यवस्था या एकमेकांना साद घालत असतात. सांस्कृतिक आणि धार्मिक व ऐतिहासिक वारसा या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने यायला समानता देत नव्हते. आपण लोकशाही मार्गाने जीवन जगत आहोत म्हणून लोकशाहीचे मूल्य व्यक्तिगत पातळीवर रुजविण्यासाठी कुटुंब, समाज आणि शाळा आणि महाविद्यालयांची जबाबदारी आहे. तसेच वक्त्यांनी पुढे भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मुलभूत अधिकार आणि कर्तव्ये सांगून ते आपल्या जीवनात अंमलबजावणी करावी असें आवाहन केले.

प्रा.डॉ.व्ही.एन.रामटेके यांनी स्त्री-पुरूष समानता आणि समाजाची मानसिकता या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी आपल्या भाषणात कौटुंबिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिकदृष्ट्या व्यक्ती ची सामाजिकीकरण झाले पाहिजे तसेच संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि समान संधी व दर्जाचे हमी देण्यात आली आहे. मानसिक दृष्ट्या सक्षम समाजाची उभारणी करायची असेल तर स्त्री पुरूष समानतही काळाची गरज आहे. भारत आज जगाचे दिशादर्शक बनते आहे. आज समाजात महिला व पुरुष एकमेकांना समजून घेऊन राष्ट्रीय विकासात योगदान देत आहेत. असे आपले विचार व्यक्त केले आहेत.

अध्यक्षीय भाषणात डॉ.एस.एन.वैष्णव यांनी लिंग समानता समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक आहे. ज्या देशात विषयी सम नता असते तो समाज सूदृढ असते. असे विचारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहेत.

सदर कार्यक्रमाचे आयोजन आणि सुत्रसंचलन समान संधी केंद्रांचे समन्वयक प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी केले. आभार प्रा.डॉ.प्रदिप तायडे यांनी मानले. या कार्यक्रमात ९७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.निता वाणी, डॉ.एस.ए.पाटील, प्रा.व्ही.एच.पाटील, डॉ.पी.आर.गवळी, प्रा.जे.पी.नेहेते, प्रा.प्रदिप तायडे, प्रा.अक्षय महाजन, श्रेयश पाटील यांनी परिश्रम घेतले.

**9. Counseling to girl students:**

Under the counseling cell of our college, Dr. VinodRamteke, Department of Psychology, guided the students on their problem. The counseling cell nicely attain towards the problem of students about admission, career, health and hygiene etc.

लोकशाही , गुरुवार दि. १६ मार्च २०२३

## पटेल विद्यालयात विद्यार्थ्यांना समुपदेशन



लोकशाही न्यूज नेटवर्क
ऐनपूर ✍ प्रतिनिधी

ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना समुपदेशन केंद्रामार्फत समुपदेशन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी समुपदेशन केंद्राचे समुपदेशक डॉ.विनोद एन.रामटेके यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेऊन एकाग्रता निर्माण करण्याकरता अनापान सती ध्यान साधनेचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घेतला. यावेळी त्यांना अभ्यासामध्ये एकाग्रता कशी निर्माण होते. या विषयी समुपदेशन केले. विद्यार्थी समुपदेशन केंद्रा मार्फत पाच विद्यार्थिनींना समुपदेशन करण्यात आले.

Sardar V.P. Arts & Sci. College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon